नोव्हेंबर

> अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणारांच्या मेंदूचा गुण होय.

# मोहनिद्रा–५

मोहनिद्रेंत मनुष्य नेहमीपेक्षा वेगळ्या तऱ्हेने कां वागतो, याचा विचार करण्यापूर्वी या दोहोंत फरक नक्की काय आहे हें पाहणें जरूर आहे. जागेपणीं जर अेखाद्याला सांगितलें की 'तुझा हात ताठ झाला आहे, तुला तो वांकवतां येणार नाही,' तर तो हंसेल आणि आपला हात वांकवून दाखवील. मोहनिद्रेंत जर त्याला तेंच सांगितलें तर त्याचा हात खरोखरच ताठ होतो आणि तो त्याला प्रयत्नानेही वांकवतां येत नाही. याचा अर्थ असा कीं जागेपणीं त्याला वाक्याचा अर्थ कळतो आणि मोहनिद्रेंतही कळतो, पण जागेपणीं त्याची स्वतंत्र विचार-शक्ति जागृत असते आणि हा अर्थ खरा असणें शक्य आहे काय, याचा विचार तो करूं शकतो आणि असा विचार केल्यामुळे त्याला हसूं येतें, कारण तो खरा असणें शक्य नाही हें त्याला समजतें. पण मोहनिद्रेंत जरी तोच अर्थ कळला, तरी विचारशक्ति नष्ट झालेली असते, यामुळे अर्थ कळल्याबरोबर तो खरा असला पाहिजे अशी त्याची भावना होते आणि या भावनेचा परिणाम त्याच्या हातावर होतो. म्हणजे त्याच्यावर जो परिणाम होतो, तो दुसऱ्याच्या प्रबल अिच्छा-शक्तीचा नसून त्याच्या स्वतःच्या मनाच्या तात्पुरत्या कमकुवतपणाचा होय.

मेंदूंत प्रत्यक्ष काय होतें हें समजणें शक्य नाही, परंतु वरील फरक लक्षांत घेतां त्याची अशी उपपत्ति लावतां येअील की मेंदूच्या ज्या भागांत विचार करण्याचें काम होतें, तो भाग मोहनिद्रेंत जागा नसतो, आणि ज्या भागांतून शरीराला हुकूम सुटतात, तेवढाच भाग काम करीत असतो. तेव्हा

यंत्राची कळ दाबली म्हणजे यंत्र जसें विचार केल्याशिवाय काम करतें, त्याचप्रमाणे अेखाद्या वाक्याचा अर्थ कळला की त्याप्रमाणे मेंदूतून हुकूम सुटतात आणि काम होतें. आतां कोणी म्हणेल की विचार करण्याची शक्तिच नसली तर अर्थ तरी कसा कळतो ? याचें उत्तर असें की शब्दांचा अर्थ आपल्या संवयीचा असल्यामुळे तो आपल्याला विचार केल्याशिवायच कळतो. संवयीच्या कोणत्याही बाबींत आपल्याला हें नेहमीच दिसतें. अेखादें नवीन काम करायचें असलें किंवा करायला शिकायचें असलें, म्हणजे सर्व लक्ष तिकडे द्यावें लागतें, पण संवय झाली म्हणजें तिकडे फारसें लक्ष द्यावें लागत नाही. अशाच तऱ्हेनें मेंदू विशेष जागृत नसला तरी शब्दांचा अर्थ कळूं शकतो. तितकी जागृति मोहनिद्रेंतही असते, पण अर्थाचा विचार करण्याअितकी नसते.

मोहनिद्रेंतील आणखी अेक विशेष म्हणजे जी सूचना द्यावी तीशिवाय अितर कोणतीही गोष्ट मनांत न येतां त्या सूचनेप्रमाणें वागण्याकडेच लक्ष असतें, 'तूं जागा झाल्यावर अमुक करशील' असें अेखाद्याला सांगितलें आणि नंतर तो जागा झाला, तरी त्याच्यावरचा मोहनिद्रेचा अंमल संपलेला नसतो. त्याचें लक्ष त्या सूचनेवर केंद्रित झालेलें असतें. 'तूं जागा झाल्यावर गणपतराव नांवाचा नामांकित नट होशील' असें अेखाद्या अशिक्षित पोराला सांगितलें, तर तो त्या नटासारखें काम करण्याचा शक्य तितका प्रयत्न करतो. अर्थात् त्याची अभिनय करण्याची ताकत किंवा वक्तृत्वशक्ति वाढत नाहीं, पण नवशिक्या नटांना आत्मविश्वास नसल्यामुळे जी भीति वाटते, तशी त्याला वाटणार नाहीं. तो पूर्ण विश्वासानें काम करील. अितकेंच नव्हे तर 'तूं नट नाहीस' असें जर कोणी सांगितलें तर तो हंसेल, 'तूं **तूं** नाहीस', असें म्हटल्यासारखेंच तें त्याला वाटेल, अितका तो त्या नटाशीं तादात्म्य पावलेला असतो.

मोहनिद्रेंतील सर्वच चमत्कारांचें कारण समजणें सोपें नाहीं, अेखाद्याला जर अशी सूचना दिली की 'यापुढें तूं वाचूं लागलास की **क** हें अक्षर तुला **ख** सारखें दिसेल', तर तसें घडतें आणि जेथे जेथे **क** येअील तेथे तेथे तो **ख** वाचतो. पण याचा अर्थ काय ? जेथे जेथे **क** येअील तेथे तेथे **ख** वाचण्याकरतां

प्रथम क हें अक्षर त्याला ओळखलेंच पाहिजे, तरच तो तेथे ख वाचूं शकेल. म्हणजे सूचनेचा परिणाम डोळ्यांवर होऊन आपोआप क च्या ठिकाणीं ख दिसतो असें नाहीं, आणि हें साहजिक आहे, कारण प्रकाशाच्या परावर्तनाच्या नियमांप्रमाणें डोळ्यांतील पडद्यावर जें चित्र उमटतें, तें सूचनेनें कसें बदलणार ? यामुळें तें अक्षर क आहे हें ओळखतेंच, पण नंतर सूचनेचा परिणाम होतो आणि तो ख वाचतो. म्हणजे हा परिणाम डोळ्यांवर होत नसून मनावर होतो, म्हणजे मेंदूवर होतो. मेंदूला सूचनेचा अर्थ समजलेला असतो आणि त्याप्रमाणें ख वाचण्याचा हुकूम तेथून सुटतो.

याहीपेक्षा चमत्कारिक उदाहरण म्हणजे एका मनुष्याला अशी सूचना दिली की ' आतांपासून एका आठवड्याने एका संमेलनांत जेव्हा काळे आणि गोरे नांवाचे तुझे दोन मित्र तुला भेटतील, तेव्हा ते भेटल्यापासून एक तास-पर्यंत तूं काळ्यांना गोरे समजशील आणि गोऱ्यांना काळे समजशील. ' याचा परिणाम असा झाला की त्या संमेलनापूर्वी जेव्हां हे मित्र त्याला भेटले, तेव्हा त्याने त्यांना बरोबर ओळखलें, पण एका आठवड्यानंतर संमेलनांत प्रथम त्याला काळे भेटले, तेव्हा त्यांचेजवळ जाऊन त्याने त्यांना विचारलें ' काळे कोठे पाहिलेत का हो ?' अितक्यांत त्या सभेंत गोरे आलेले पाहून तो म्हणाला, ' हां, हे पहा काळे आलेच. ' पुढे एक तासपर्यंत आपण कांहीं चूक करतों आहोंत हें त्याला सांगूनही खरें वाटेना. एका तासानंतर मात्र तो कांही वेळ गोंधळल्यासारखा दिसला, पण त्याने लगेच पुन्हा संभाषण सुरू केलें. ' तुम्ही अितका वेळ असा घोटाळा कां करीत होतांत ? ' असें विचारतां तो म्हणाला, ' कोण, मी ? मी मुळींच घोटाळा केला नाही.'

आणखी एक प्रसंग असा की काळे आणि गोरे हे स्नेही होते. त्यापैकी काळे याला अशी सूचना दिली की आतांपासून तीन तासपर्यंत तुला गोरे म्हणजे फडके वाटतील आणि फडके म्हणजे गोरे वाटतील. या तीन तासांत हे तिघे मित्र बरोबर फिरायला गेले, एकत्र जेवले, बिलियर्डज खेळले, पण या सर्व वेळांत काळे याला गोरे म्हणजे फडके आणि फडके

म्हणजे गोरे वाटत होते. ते तीन तास संपल्यावर तो मोहनिद्रेंतून जागा झाला. तेव्हा त्याला आपण केलेल्या सर्व गोष्टी आठवल्या, पण ज्या गोष्टी गोऱ्यांनी केल्या होत्या त्या फडक्यांनी केल्या असें तो समजत होता आणि फडक्यांनी केल्या त्या गोऱ्यांनी केल्या असें समजत होता, आणि कोणी सांगून त्याची समजूत पटेना.

मोहनिद्रेंत मेंदूची स्थितिच बदलते असें म्हणावें लागतें, कारण या स्थितींत झालेल्या गोष्टींची आठवण जागेपणीं रहात नाहीं, आणि मेंदू पुन्हा त्या स्थितींत गेल्यावर आठवतात. म्हणजे आठवण ही मेंदूंतील अंतर्लेखांच्या द्वारें राहते असें गृहीत धरलें, तर असें म्हणावें लागतें की जागेपणांतील अंतर्लेख मोहनिद्रेंत पुसून जातात, पण पुनः जागेपणीं उमटतात, आणि मोह-निद्रेंतील अंतर्लेख जागेपणीं पुसून जातात आणि पुनः मोहनिद्रेंत उमटतात.

मेंदूवर आपल्याला ताबा चालवतां येत नाहीं. मेंदू आपल्या नकळत काम करीत असतो आणि झोपेंतही तो निद्रिस्त रहात नाही, कारण अेखादा प्रश्न सुटत नाही म्हणून निजण्यापूर्वी आपण सोडून दिला असला, तर तो सकाळीं अचानक सुटलेला आढळतो, असा अनुभव पुष्क-ळांना येतो आणि याकरतां झोपच पाहिजे असेंही नाहीं, जागेपणीं देखील आपलें लक्ष तिकडे नसतांना मेंदूंत विचार चाललेलाच असतो आणि सकाळीं सोडून दिलेला प्रश्न संध्याकाळला आपोआप सुटतो. मोहनिद्रेंत मात्र कांहीं अंशीं दुस-ऱ्यानें केलेल्या सूचनेचा ताबा मेंदूवर चालतो असें म्हणावें लागतें, पण त्याचा अर्थ अितकाच असतो की खऱ्याखोट्याचा किंवा बऱ्यावाअिटाचा विचार कर-ण्याची शक्ति मोहनिद्रेंत नाहीशी झालेली असते आणि मनुष्य सूचनेप्रमाणें यंत्रासारखा वागतो. मात्र याला मर्यादा आहे. मनाला जबर धक्का बसेल अशी सूचना जर मोहनिद्रेंत दिली तर मनुष्य ती अंमलांत आणीत नाही. अेखाद्या जिवलग माणसाच्या छातींत सुरी खुपसण्याची सूचना कोणी दिली, तर कोणीही ती अंमलांत आणणार नाहीं.

मनुष्येतर प्राण्यांतही मोहनिद्रेसारखी स्थिति उत्पन्न करतां येते. १६४६

साली किर्शर यानें असे प्रयोग केले. अेका कोंबडीचे पाय बांधले आणि तिला जमिनीवर ठेवून तिच्या चोंचीपासून जमिनीवर अेक खडूची रेघ काढली, आणि यामुळें ती निश्चल बसून राहिली. तसेंच कोंबडीचें डोकें तिच्या पंखाखालीं घालून तिला पाळण्यासारखे झोके दिले, तर तिला झोप लागली असें दिसतें, आणि या स्थितींत तिला भलत्याच घरट्यांतील अंड्यांवर बसवलें, तर ती जागी झाल्यावर त्याच घरट्यांत बसून तेथे असतील ती अंडीं उबवते.

कित्येक प्राण्यांकडे केवळ दृष्टि लावल्यानें त्यांना ताब्यांत ठेवतां येतें. वाघासारखा प्राणी देखील नेहमी मागून अंगावर उडी टाकायला पाहतो. त्याच्याकडे टक लावून पहात राहिलें तर त्याची अेकदम उडी मारण्याची छाती होत नाहीं, तो डोळे चुकवूं पाहतो.

विशिष्ट ठिकाणीं दाबल्यानें कित्येक प्राण्यांना झोंप येते आणि ते निश्चल होतात. सरडे, बेडूक, वगैरे प्राण्यांवर असा परिणाम होतो. अेरवी सरडा पाठी-वर ठेवल्यास ताबडतोब पुन्हा पायांवर उभा राहतो, पण अशा स्थितींत तो पाठीवर ठेवला तरी तसाच राहतो.

तथापि या स्थितीला मोहनिद्रा म्हणतां येअील की काय याची शंका आहे. बेडूक सापासमोर असल्यास त्याला हालचाल करतां येत नाही आणि तो सापाची वाट पहात स्तब्ध राहतो असें म्हणतात, पण हें सर्वथैव खरें नाही. अेकानें प्रयोग करून असा अनुभव दिला आहे की शंभर बेडूक प्रयोगाकरतां सापांच्या पिंजऱ्यांत अेकामागून अेक सोडले असतां त्यांपैकीं फक्त सहांची अशी स्थिति झाली, पण बाकीचे सापानें पकडीपर्यंत अेकसारखी धडपड करीत होते. ( पुढील अंकीं समाप्त )

---

# बूमरँग *

लेखक, स० हृदय, महाड.

—काय झकास आहे रे ती पोर!—भालू व्हरांड्यांतून खोलींत येत

आपला मित्र नरहरि याच्याजवळ बोलला. नरहरीने उत्तर दिलें नाही.

—कोणाची रे ती ?—तरीही नरहरि गप्प राहिला.

—भगतने आणली आहे की काय कोणासाठी ?—भालूच्या या प्रश्नाने नरहरि हंसला.

ती भगत बद्रीनाथ याचीच कन्या होती. ती अद्यापपर्यंत भालचंद्राला न दिसण्याचें कारण भगतची भीति आणि नीति हें होतें. गेल्या तीन वर्षांत त्यानें तिला आपल्या खोलींतून जरा सुद्धां बाहेर पडूं दिलें नव्हतें. आज ती आपल्या खोलीच्या व्हरांड्यांतून केळ्यांचीं सालें बाहेर टाकण्यासाठी आली होती म्हणून भालूला ती दिसूं शकली. नरहरि त्या 'निवास' मधें वर्षभर राहिला होता. त्यानें दोन तीन वेळां दुलारीला पाहिलें होतें. त्याची पण जिज्ञासा वाढली होती. तपासांतीं त्याला अितकीच माहिती मिळाली होती, ती त्याने भालूला विदित केली.

दोन अडीच लाख वस्तीच्या शहरांतील रेल्वे स्टेशनवर भगत बद्रीनाथने अेक 'निवास' उघडला होता. शहरांत जागा मिळत नव्हती म्हणून त्या 'बद्रिकेश्वर हिंदु निवास' मधें नरहरि अेक खोली घेऊन राहिला होता. भालूला तेथेच नोकरी मिळाल्यामुळे जागेच्या अभावीं तो पण नरहरीच्याच खोलींत मुक्काम ठोकून होता.

त्या शहरालगतच सरकारने युद्धकारणांसाठीं प्रचंड कँप उघडला होता. त्याने जवळजवळ पांच मैलांचा टापू व्यापला होता. तेथे हरतऱ्हेनें शिक्षण घेण्यासाठी गोरे आणि काळे मिळून लाखाच्या वर सैनिक नेहमी असत. त्या सर्वांना लागणाऱ्या पुरवठ्याचा प्रश्न तितकाच प्रचंड होता. निरनिराळीं कितीतरी जातीचीं कंत्राटें निरनिराळ्या कंत्राटदारांनी घेतलीं होतीं. अर्थात् त्या शहराच्या स्टेशनवर मोठीच उलाढाल होअी. मोटर ट्रक्स वगैरेची

---

* आस्ट्रेलियांतील मूळ रहिवासी या नांवाचें अेक अस्त्र वापरतात, त्याचा आकार वांकलेल्या काठीसारखा असतो आणि तें फेकणाराकडे परत येतें. यावरून आपण योजलेली युक्ति आपल्यावरच उलटली तर तिला 'बूमरँग 'ची उपमा देतात.

रहदारी रात्रंदिवस चालू असे.

त्यामुळे स्टेशनसमोरच असलेल्या 'बद्रिकेश्वर हिंदु निवास' ला गिन्हाअिकी पण चिक्कार मिळूं लागली. तो हिंदु निवास होता तरी तेथे हिंद्वेतरांना मज्जाव होता असें मात्र नव्हे. सर्व लोकांना तेथे 'खाना' अगदीं 'मोजूद' असे, आणि यामुळे तो निवास रात्रंदिवस चालू असे.

अेका मोठ्या गुजराथी कंत्राटदारातर्फे तेथील कचेरीवर काम करण्यासाठी म्हणून भालू आणि नरहरि यांची नेमणूक झाली होती. त्या खोलीसमोरच्या भागांत भगत बद्रीनाथचें बिऱ्हाड होतें. बाहेरच्या बाजूला त्याचा उद्योग चालत असे.

अशा परिस्थितींत भगतची दुलारी भालूच्या नजरेस चुकून पडली. दुलारीचें लग्न भल्या माणसाशीं जुळवण्याच्या खटपटींत भगत बरेच दिवस होता. पण वाढत्या व्यापामुळे त्याला त्या बाबीकडे भरपूर लक्ष देतां येत नसे. लग्न होअीपर्यंत त्याने तिला 'योग्य' तऱ्हेने बंदोबस्तांत ठेवलें होतें. कारण उघड होतें. त्या निवासमध्यें शेंकड्याने येणाऱ्या नवीन नवीन भल्याबुऱ्या माणसांच्या ती दृष्टीला पडूं नये. उगीच लग्नाला अडचण उत्पन्न व्हायची त्याला धास्ती वाटे.

शिवाय त्याचा उद्योग पण अनेक भानगडींचा होता. त्याच्या निवासमध्यें कामानिमित्ताने अेकदोन दिवस वस्तीला राहणाऱ्या पैसेवाल्या रंगेल गिऱ्हाअिकांची पण गरज भागवल्याशिवाय आपला निवास चांगला चालणार नाही याची त्याला खात्री पटली होती. नरहरीला पण अेकदां खुषींत येऊन त्यानें खुबीदार प्रश्न केला होता, पण नरहरि त्यांतला नाही याची त्याला कल्पना येतांच त्यानें तो विषय बंद केला, आणि त्याच खात्रीने त्याने नरहरीला निवासची मागील खोली वापरण्यास परवानगी दिली होती. फुकट नाहीं, भरपूर भाडें घेऊनच.

नरहरि अविवाहित होता, तसा भालू पण अविवाहित होता. मिळणाऱ्या रगड पगारांत जी गंमत करतां येईल ती ते करीत, नाही असे नाही. अद्याप ती मर्यादेंतच होती. पण गंमतीला चटावलेल्या भालूला निवासांतील

दररात्रीचें नंदनवन पाहून कांहीच वाटणार नाहीं का ? तो मनुष्यच होता.

नरहरि फारसा बोलणारा नव्हता. भालू मनांत येअील तें मोकळेपणानें बोलत असे, भालूच्या बोलण्यावरून त्याला दुलारीविषयी अभिलाषा उत्पन्न झाली होती हें समजून आलें. दुलारी भगतची मुलगी, तिची आअी घरांतच असते, अशा निरपराध मुलीला भानगडींत ओढण्यांत हंशील नाही, तें आपल्याला शोभणार नाही, याची त्या दुक्कलीला जाणीव देण्याचें कारण नव्हतें.

भगतनें त्या शहरांतील अनेक गरजू स्त्रियांना पैसे मिळवून दिले होते. त्यानेही त्यांत पैसे मिळवले, नि शिवाय अशी उथळी गिऱ्हाअिकीही टिकवून धरली. अशीं माणसे कांही ना कांही निमित्ताने त्या निवासमध्यें राहण्यासाठीं धडपडूं लागलीं होतीं. भगतचा दुहेरी फायदा होअी, त्याचें त्यांत कांही जात नव्हतें. पण या गोष्टीचा विचार या दुक्कलीने स्वतःला अनुकूल असा केला. दुसऱ्यांच्या बायकांना आणि तरुण पोरींना वाअीट मार्ग दाखवतांना भगतला कुठे नीति सुचत होती ! मग आपण तरी काय म्हणून असा सोंवळा विचार करावा ?

भालूचा हा तोडगा अैकून नरहरि जरा धीट झाला. कोंवळ्या दुलारीच्या प्राप्तीच्या वांट्यांत दोघांची भागीदारी ठरली. भालू दिसायला उमदा होता, वशीकरणाचें काम त्यानें आपल्या अंगावर घेतलें. पुढची यातायात करण्याचें काम नरहरीनें घेतलें.

आंतील हालणाऱ्या सांवल्यांवरून भालचंद्रानें भगतच्या खोलींत कोण कोण माणसें असावीं याचा तर्क केला, आणि भगतची बायको त्या खोलींत केव्हां नसते, याचे पण आडाखे त्याने बांधले. त्या खोलींत अेकटी दुलारी असेल असें ओळखून त्याने अेक कागदी विमान तिच्या खिडकीवाटे आंत सोडलें. 'कोणी चावटपणा केला हा ?' या हिरीरीने दुलारी चटकन् खिडकीशीं आली. तिने वर पाहिलें, भालूने लाघवी स्मित केलें.

दुलारी रागावली नाही, तशीच आंत गेली. थोड्या वेळानें भालूने तोच

प्रयोग पुन्हा केला. ती बाहेर आली, आणि त्याच्याकडे पाहून हंसलीही. आपली आअी आंत नसली म्हणजे दुलारी खिडकींत उभी राही. भालू तेथे असला म्हणजे तोही उभा राही. परस्परांना पाहण्याचा अेकमेकांना मोह वाटूं लागला. तसल्याच विमानांवर आरूढ होऊन भगतनें राखलेल्या बंदोबस्तांतूनही दुलारीला भालूचीं पत्रें मिळूं लागली, आणि त्या पत्रांबरोबर चलनी नोटाही उडूं लागल्या होत्या.

सर्व कांहीं मुक्रर झालें; आपण उद्यां कंपनीच्या कामासाठीं आठ दिवस बाहेरगांवीं जात आहों, असें नरहरीनें भगतला कळवलें. भालू तेथेच राहणार होता.

पहाटच्या गाडीने नरहरि तेथून जाणार होता. ती गाडी गांठण्यासाठीं दुलारी निवासच्या मागील दारानें हलकेच बाहेर पडली. भालू स्टेशनवर होताच तूं थोडे दिवस नरहरीबरोबर जा, नंतर मी येतोंच, असें सांगून त्यानें दुलारीचें मन वळवलें. तिला नरहरीबरोबर जाणें कसेंसेंच वाटलें, पण परत मागे फिरणें शक्य नव्हतें. चालून आलेली संधि जाणार होती.

भालू सकाळीं उठून बाहेर आला, तों दुलारी कोठे नाहीशी झाल्याबद्दल भगतची धांवपळ सुरूं झाली होती. नरहरीविषयीं त्याला खात्री होती, म्हणून त्याला त्याचा संशय आला नाही. पोलीसकडे वर्दी द्यावी तर नसती प्रसिद्धि मिळून, बरें तर बरें, नाहीतर आणखी दुष्कीर्ति व्हायची. म्हणून तो खासगी रीतीने तपास करूं लागला होता.

नरहरीच्या कर्तबगारीनें अेक तरुणी पहाटे स्टेशनवर आली होती, पण ती कुठें गेली हें माहीत नाहीं, अितकाच तपास भगतला स्टेशनवर लागला. ती कोण होती हें आपल्याला माहीत नव्हतें, म्हणून आपण जास्त तपास केला नाही, असें स्टेशनमास्तरनें उत्तर दिलें. आपली मुलगी आपण बंदोबस्तांत ठेवली ही मोठी चूक झाली असें भगतला वाटलें. पण आतां करणार काय?

पांचसहा दिवसांनी नरहरि आला. दुसऱ्या दिवशीं कंपनीच्या कामासाठीं भालू बाहेरगांवीं गेला.

बरेच दिवस झाले. आपल्या मुलीचा पत्ता लागला नाही म्हणून भगत बद्रीनाथ हताश झाला. नरहरि-माल्ू या दुक्कलीला मधूनमधून कंपनीच्या वाढत्या कामाचा उरक करण्यासाठी बाहेरगांवीं कां जावें लागे, याचा जरासुद्धां संशय भगतला आला नाही.

ठरल्याप्रमाणें माल्ू आपल्याशीं लग्न करीत नाही तो नाही, आणि शिवाय तो आपल्याला भलतीच भागीदारी करायला भाग पाडतो, असें पाहून शेवटीं कंटाळून दुलारी अेकटीच परत आली आणि आपल्या बापाच्या दृष्टीस पडली. भगतने तिला खूप बडवली. काय झालें तें तिने त्याला मुळीच सांगितलें नाही. तिला त्याने कडक बंदोबस्तांत ठेवलें.

भगतचा दोस्त अबदुल ड्रायव्हर अेका रात्रीं निवासमधें वस्तीला होता. ‘ वो नयी छोकरी ला दो भय्या ! ’ त्याने भगतला गळ घातली.

आपल्या मुलीचीच हा + + + मागणी करतो आहे, याची भगतला कल्पना येण्यास वेळ लागला नाही. भगत रागारागाने माडीवर गेला, तेव्हा त्याला कलाप्पा कॉंट्रॅक्टरचा निरोप आला. भगत त्याच्या खोलींत गेला. कलाप्पानेही हंसत हंसत दुलारीची मागणी केली. दुलारी आपली कन्या आहे हें कोणत्या तोंडाने तो सांगणार ?

तीनचार महिन्यांपूर्वी निवासांतून अेक तरुण पोरगी पळून गेल्याचें व त्याबाबत भगत तपास करीत असल्याचें त्याने गुप्त म्हणून राखलेलें प्रकरण सर्वांच्या कानीं पोंचलें होतें. आणि ती पोरगी पुन्हा निवासांत आली, हेंही विद्युद्वेगाने सर्वांना कळलें. ती आपल्याला मिळावी म्हणून गरजू माणसांचे प्रयत्न सुरू झाले. निवासमधें असल्या गरजा भगत हरहमेश पुरवतो, हें अंमलदारां-पासून कलमदार–क्लीनर्स पर्यंत सर्वांना माहीतच होतें.

दुसऱ्या दिवसापासून अेकाअेकीं आपला निवास बंद करून भगत बद्रीनाथ दुलारीसह आपल्या देशांत निघून गेला, नि दिवसाचे चोवीस तास दुलारीचें लग्न जमवण्याच्या उद्योगास लागला.

---

# कामविषयक गुन्हे

या बाबतींत कायद्याने जे गुन्हे मानलेले आहेत, त्यांचा येथे विचार करणें आहे. ते नैतिक दृष्ट्या पुष्कळ वेळां गुन्ह्यांच्या सदरांत जात नाहीत, कारण त्यांत कोणाचेंही नुकसान नसतें. केवळ धार्मिक किंवा पारंपरिक समजुती-मुळें ते गुन्हे मानलेले असतात आणि त्यांनीं होणारें नुकसान केवळ मानीव असतें.

संततिनियमनाचीं साधनें विकणें हा अिंग्लंडांत गुन्हा मानलेला नसल्या-मुळे येथेही गुन्हा मानलेला नाही. अितर कांही (उदा० फ्रान्स) देशांत साधनें विकणें गुन्हा आहे, अितकेंच नव्हे तर संततिनियमनाचा पुरस्कार करण हा देखील गुन्हा आहे. स्वातंत्र्याची टिमकी वाजवणाऱ्या फ्रान्ससारख्या देशांत हा गुन्हा मानावा याचें कोणाला आश्चर्य वाटेल, पण तेथील लोकसंख्या पुरेशी वाढत नाही या मुद्यावर तो गुन्हा मानलेला आहे. अर्थात् लोकसंख्या वाढल्याने कांहीं पुण्य लागत नाही, परंतु फ्रान्सला नेहमी जर्मनीची भीति वाटत होती आणि लोकसंख्या वाढवणें हा अेक प्रतिकाराचा मार्ग, म्हणून हा गुन्हा मानलेला होता. पण संततिनियमनाचे फायदे तेथील लोकांना अितके स्पष्ट दिसत होते की या कायद्याला कोणीही कधी जुमानलें नाही. तेथें पुरस्काराची जरूरच नव्हती, तरीपण केवळ अन्यायाला विरोध करण्यासाठी पुरस्कार करून तेथे कित्येक लोक तुरुं-गांत गेले आणि शेवटीं 'व्हिक्तर मार्गरित' या प्रसिद्ध कादंबरीकाराने अेका कादंबरींत संततिनियमनाचा उघड पुरस्कार करून सरकारला स्पष्ट आव्हान दिलें की छाती असेल तर माझ्यावर फिर्याद करा. आणि त्याच्यावर फिर्याद झाली नाही, यावरून लोकमताचा पाठिंबा कोणत्या बाजूला होता हें सहज दिसतें.

अिंग्लंडांत तो गुन्हा मानलेला नाही याचें कारण सरकारचा समंजस-पणा नव्हे. हीं साधनें कांही लोक विकूं लागले होते आणि त्याविरुद्ध नवीन कायदा करावा लागला असता, तो कोणी पुरस्कारला नाही अितकेंच. तरीपण संततिनियमनाच्या प्रचाराला सरकारी पाठिंबा नव्हता आणि ब्रॅडलॉ व बेझंट-

बाअी यांनी प्रचाराकरतां जेव्हा अेक पुस्तिका प्रसिद्ध केली, तेव्हा त्याचा प्रतिकार करण्याकरतां त्याविरुद्ध कायदा नसल्यामुळें अश्लीलतेचा आरोप त्यांचेवर ठेवण्यांत आला. अर्थात् पुस्तिकेंत 'अश्लील' असें कांहीच नव्हतें, तरीपण अश्लीलतेचा कायदाच असा आहे की केवळ मॅजिस्ट्रेटाच्या मर्जीप्रमाणें शिक्षा करतां येते. तेथे हीं दोन्ही माणसें वक्तृत्वाबद्दल नांवाजलेली होतीं आणि त्यांनी स्वतःच वकिली करून खटला जिंकला. येथें आमचेवर अशाच प्रकारचा खटला झाला असतां मॅजिस्ट्रेट हेकेखोर भेटल्यामुळें आम्हास शिक्षा झाली. हा खटला संततिनियमनाबद्दल नव्हता, कारण तो प्रचार अश्लील नाही असें आतां कायद्याच्या पुस्तकांतच लिहिलेलें सांपडतें. पण दुसऱ्या कोणत्याही कायद्याखाली आम्ही सांपडत नव्हतों आणि सनातनी लोकांच्या चिथावणीने या कायद्याखाली आम्हास पकडलें, कारण या कायद्याला पुरावा लागत नाही, केवळ मॅजिस्ट्रेट ज्या बाजूचा असेल त्या बाजूचा निकाल होतो.

संततिनियमनाकरतां जी शस्त्रक्रिया करतात, ती कितपत कायदेशीर आहे याबद्दल अिंग्लंडांत अजूनही शंका आहे. पण आज या शस्त्रक्रिया हजारों होत आहेत आणि त्याबद्दल कोणावरहीं खटले झालेले नाहीत. आम्ही या बाबतींत डॉ. नॉर्मन हेअर यांना विचारलें असतां ते उत्तरले की रोग्याच्या खर्चाने शस्त्रक्रिया केल्यास हरकत नाही, पण सार्वजनिक अिस्पितळांत केल्यास मात्र कायदेशीर होणार नाही. पण अजून कोणत्याही न्यायालयाने या बाबतींत निकाल दिलेला नाहीं.

गर्भपाताविरुद्ध बहुतेक देशांत कायदे आहेत. रशियांतील क्रांतीनंतर कांही वर्षे कोणत्याही स्त्रीने कांहीही कारण न देतां गर्भपाताची मागणी केल्यास ती सरकारी अिस्पितळांत गेल्यास तेथे कायदेशीर गर्भपात करीत असत आणि हाच समंजस मार्ग आहे, कारण अशी सोय नसल्यास स्त्रिया जिवाचा धोका पतकरून देखील गर्भपात करतात असा सार्वत्रिक अनुभव आहे. तेव्हा कायद्याने मुलाचा जीव वांचवण्याचा उद्देश तर साधत नाहीच, पण स्त्रीचा जीवही धोक्यांत येतो. या दृष्टीने गर्भपाताविरुद्ध कायदाच नसावा, म्हणजे डाक्तरांना राजरोस



289527

गर्भपात करतां येईल, असें आतां पुष्कळांना वाटूं लागलें आहे. आज स्थिति अशी आहे की श्रीमंतांकडून बरेच पैसे उकळून गर्भपात करणारे डाक्तर कमी नाहीत, पण गरिबांना मात्र तशी सोय नाही. यापेक्षा सार्वजनिक अिस्पितळांत अशी सोय करणें श्रेयस्कर होईल. अर्थात् हें फक्त समंजस लोकांनाच मान्य होईल, कारण ते परिणामांकडे लक्ष देतात. ज्यांची नीति धर्मावर अवलंबून असेल, त्यांना या गोष्टी कळणार नाहींत. हल्ली रशियांत देखील पूर्वीच्या सवलती नाहीत. आतां कारणें दाखवावीं लागतात आणि तीं अेका सरकारी समितीस पसंत पडल्यासच गर्भपात करतां येतो आणि तो देखील तीन महिन्यांच्या आंतच केला पाहिजे. अर्थात् स्त्रीचा जीव बांचवण्याकरतां गर्भपात अवश्य आहे या सबबीवर कायदेशीर गर्भपात कोठेही करतां येतो, पण त्याला निदान दोन डाक्तरांचे संगनमत व्हावें लागतें.

अिंग्लंडांत 'युजेनिक्स सोसायटी'(सुप्रजाजननसंस्था) ने असें मत दिलें होतें की जेव्हां गर्भधारणेच्या मुळाशीं बळजबरी असेल, किंवा जवळच्या नात्याच्या माणसांचा संबंध असेल, तेव्हां गर्भपात कायदेशीर समजावा. अर्थात् बळजबरी झाल्यास स्त्रीला तें मूल नको असेल हें निर्विवाद आहे, पण बळजबरीचे खटले पुष्कळ वेळां खोटे असतात. म्हणजे स्त्रीच्या संमतीनेच संबंध झालेला असतो, पण तो चुकून उघडकीस आल्यास स्त्री बळजबरीचा आरोप करते. तेव्हां असा कायदा केला तरी तो अंमलांत आणणें कठिण. अर्थात् बळजबरी झाली असेल तेव्हा गर्भपात करणाऱ्या डाक्तरावर सामान्यतः फिर्याद करीत नाहीत, पण ॲलेक बोर्न यांनीं अशा रीतीने गर्भपात करून मुद्दाम पोलीसला कळवल्यामुळें त्यांच्यावर खटला करणें सरकारला भाग पडलें. पण त्यानें निर्णय झाला नाही, कारण त्या स्त्रीच्या जीवाला धोका होता याच मुद्यावर त्यांना निर्दोष ठरवण्यांत आलें.

मातापितरांत दोष असल्यामुळें जेव्हा त्यांचें मूल वेडगळ किंवा लंगडेंलुळें होण्याचा संभव असेल तेव्हा गर्भपात कायदेशीर समजावा असेंही कांहींचें म्हणणें आहे. तरी असा कायदा अंमलांत आणणें सोपें नाही. स्त्रीमध्येंच कांहीं

दोष असेल तर ठीक, पण कोणतीही स्त्री असें म्हणू शकेल कीं आपल्या स्वतःच्या किंवा पुरुषाच्या कुटूंबांत अस कांहीं आनुवंशिक दोष आहेत की त्यामुळे मूल चांगलें होणार नाही.

अेक बायको जिवंत असतांना दुसरी करणें हा यूरोपांत आणि आतां येथेंही गुन्हा आहे आणि स्त्रियांना दोन नवऱ्यांची परवानगी कोठेच नाहीं. हा केवळ मानलेला गुन्हा आहे. अशा विवाहांपासून मुलें दोषी निपजतील असें कोणीही म्हणत नाही, किंवा त्यांत दुसरेंही कांहीं सामाजिक नुकसान नाही. हे कायदे केवळ पतिपत्नींच्या अेकमेकांवरील मालकीहक्काच्या रक्षणाकरतां केलेले असतात आणि असा मालकीहक्क मानणें म्हणजे रानटीपणाचा अवशेष आहे. पण तो अजून सर्वत्र आहे आणि यांत कांही वावगें आहे असें कोणाला वाटत नाही, अितकेंच नव्हे तर हिंदुस्थानांत अनेक बायका करण्याची असलेली परवानगी, निदान हिंदूंच्या बाबतींत, कायद्याने नुकतीच रद्द झाली आणि याला लोक सुधारणा समजतात !

बळजबरी हा सर्व देशांत गुन्हा आहे आणि हें योग्यच आहे, कारण बळजबरीने स्त्रीचें मोठेंसें नुकसान होतें असें जरी सिद्ध करतां येणार नाही, तरी हा वैयक्तिक हक्कांचा प्रश्न आहे आणि या दृष्टीने महत्वाचा आहे. मात्र याचें स्वरूप कायद्याने मानलेलें आहे तितकें भयंकर नाही आणि त्याला शिक्षाही फाजील कडक ठेवलेली आहे. बळजबरी हा हल्ला करण्याचा अेक प्रकार आहे आणि कोणावरही शारीरिक हल्ला करणें हा गुन्हा मानणें रास्त आहे. तथापि बळजबरीला जी धार्मिक भूमिकेवरून शिक्षा केली जाते ती मात्र गैर आहे. हल्ल्यांत कोणाचें किती नुकसान होतें हें पाहून त्या मानाने शिक्षा करणें योग्यच आहे.

समसंभोगाविषयीं अिंग्लंडातील कायदा आणि त्यावर आधारलेला येथील कायदाही चमत्कारिक आहे. हा कायदा असा की पुरुषांचे बाबतींत तो गुन्हा आहे, स्त्रियांचे बाबतींत नाही. गुन्ह्याने किती नुकसान होतें हें पाहिल्यास कदाचित् हा फरक समर्थनीय आहे असेंही म्हणतां येईल, परंतु या कायद्यावर

मुख्य आक्षेप असा घेतां येईल की या कायद्याने कोणाचाही फायदा न होतां नुकसान मात्र होतें. हा गुन्हा करणारे लोक फारच थोडे असतात आणि तो अेकमेकांच्या संमतीनेच होत असल्यामुळें त्यांत दुसऱ्या कोणाचें नुकसान होतच नाही. उलट हा गुन्हा पोलिसाला कळणें जवळजवळ अशक्यच असतें. तेव्हां अशा कायद्याला समाजाच्या हिताच्या दृष्टीने काय महत्व आहे, असेंहि कोणी म्हणेल, पण कधी कधी मात्र अशा कायद्याने अेखाद्याचें भयंकर नुकसान होतें, याचें एक उदाहरण सेसिल बिनी, बार–अॅट–लॉ, या वकिलाने दिलें आहे. वीस वर्षांपूर्वी दोन माणसांवर या गुन्ह्याबद्दल खटला झाला. त्यांपैकीं अेक लष्करी शिपाअी होता, दुसरा विवाहित असून तो विवाह सुखी होता. या दोघांची अेकदांच गांठ पडली होती आणि हा गुन्हा केल्यावर दोघांपैकीं अेकाने ( अर्थात् लष्करी शिपायाने ) पोलिसाकडे जाऊन गुन्ह्याची कबुली दिली, अेरवी तो कोणाला कळलाच नसता. पोलिसाने दुसऱ्या माणसाची जबानी घेतली आणि त्यानेही तो गुन्हा कबूल केला. या दोन्ही माणसांना कैदेची शिक्षा झाली. या शिक्षेने कोणाचा फायदा झाला ? या गुन्ह्याबद्दल ज्यांना शिक्षा झाली असेल त्यांना जगांत तोंड दाखवायला जागा नाहीशी होते आणि फायदा कोणाचाच होत नाही. असे कायदे नसलेले बरे असेंच म्हटलें पाहिजे. फ्रान्समधें या बाबतींत फार समंजस कायदा आहे, तो असा की या गोष्टी जोंपर्यंत खाजगी रीतीने होऊन कोणाच्या नजरेस आल्या नाहीत, म्हणजे प्रत्यक्ष दृष्टीस पडल्या नाहीत, तोंपर्यंत त्या गुन्ह्यांच्या सदरांत येतच नाहीत. अर्थात् त्या दोघांच्या संमतीने होतात असें येथें गृहीत धरलें आहे.

जवळच्या नात्यांतील स्त्रीपुरुषांचा संबंध हा सर्वत्र गुन्हा मानतात, पण जवळचें नातें म्हणजे काय याची व्याख्या मात्र सर्वत्र सारखी नाही. अिंग्लंडांत या बाबतींत १९०८ पर्यंत कायदा नव्हता आणि त्या सालीं जो कायदा झाला, तो सुप्रजाजननाच्या दृष्टीने झाला हें जरी खरें, तरी अशा संबंधांपासून कांही नुकसान आहे हें शास्त्रीय दृष्टया सिद्ध झालेलें नाही. जवळच्या

नात्याच्या माणसांत अेकच आनुवंशिक दोष असण्याचा कदाचित् संभव असतो हें खरें, आणि असा दोष दोघांतही असेल तर तो मुलांत उतरण्याची खात्री असते हेंही खरें, पण असा दोष नसल्यास त्यापासून नुकसान नाही आणि असा समान दोष फक्त नात्याच्याच माणसांत असतो असें नाही. तो कोणत्याही दोन स्त्रीपुरुषांत असणें शक्य आहे, पण कायदा फक्त नात्यांतल्या माणसांपुरतीच ही दृष्टि लावतो हें गैर आहे. प्राचीन मिसर देशांत टॉलेमी नांवाच्या राजघराण्यांत भावाचें लग्न बहिणीशींच झालें पाहिजे अशी पद्धत होती! आणि त्याचे कांही दुष्परिणाम दिसले नाहीत, निदान त्या घराण्याने मिसरचें राज्य बळकावलें तेव्हापासून त्यांना स्वदेशांत आणि परदेशांत अनेक शत्रु असतांही त्या सर्वांना तोंड देऊन त्यांनी तीनशें वर्षेपर्यंत आपली सत्ता टिकवली. यावरून अशा विवाहांनी त्यांच्यांत कांहीं कमतरता उत्पन्न झाल्याचें दिसत नाही. तेव्हा केवळ दोन माणसांत जवळचें नातें आहे अेवढ्यावरूनच त्यांचा संबंध सुप्रजाजननाच्या दृष्टीने गैर आहे असें सिद्ध होत नाही आणि कायद्याची ही दृष्टि गैर होती असेंच म्हणावें लागतें. प्रसिद्ध राणी क्लिओपॅट्रा ही या घराण्यांतली शेवटची राणी होती, आणि या तीनशें वर्षांत मिसर देशाची सर्व बाबतींत भरभराटच झाली होती. केवळ व्यापारांतच नव्हे, तर कलेच्या आणि वाङ्मयाच्याही बाबतींत मिसर देश जगाच्या अघाडीवर होता. यावरून अैतिहासिक पुरावा या कायद्याच्या विरुद्धच दिसतो. या कायद्यांतला अेक चमत्कार म्हणजे चुलता आणि पुतणी यांचा संबंध यूरोपांत गुन्हा मानलेला नाही. अेकंदरींत पाहतां या कायद्याला सुप्रजाजननाचा तात्विक आधार शास्त्रीय दृष्ट्या मिळत नाहीं.

बऱ्याच कायद्यांत ते करणारांचा निष्काळजीपणा किंवा अज्ञान दिसतें हें निर्विवाद आहे. अिंग्लंडांत तर अशी हास्यास्पद स्थिति होती की स्त्री वयाच्या सोळाव्या वर्षापूर्वी संभोगाला संमति देण्यास देखील पात्र समजली जात नसे, पण १९२९ सालापर्यंत बारा वर्षांच्या मुलीचें कायदेशीर लग्न होत असे. मुलीला ज्या वयांत मूल होऊं शकतें, त्या वयांत ती जननाला पात्र आहे असें कां समजूं नये ? आणि या युद्धांत अिंग्लंडांत ज्या मुलींना अनौरस मुलें

झालीं आहेत, त्या अत्यंत अल्पवयी आहेत आणि तीं मुलें प्रकृतीने अत्यंत सुदृढ आहेत. तेव्हां लवकर मुलें होण्यांत मुलांचें कांहीच नुकसान नाही. पण सामाजिक दृष्ट्या अशा मुलींना विवाहित स्त्रीची जबाबदारी संभाळतां येईल की नाही हा प्रश्न वेगळा आहे. अर्थात् संमतीसंबंधी कायद्यांत दोन प्रकार आहेत. इंग्लंडांत तेरा वर्षांखालील मुलीशीं संबंध तिच्या संमतीनें झाला तरी तो बळजबरीच्याच सदरांत जातो आणि त्याला बळजबरी समजूनच शिक्षा होते. पण हा गुन्हा करणारा देखील पुष्कळ वेळां अल्पवयी मुलगाच असतो आणि त्यालाही यांतलें कांही कळत नसतें. खेळतां खेळतां हा गुन्हा झालेला असतो. तेव्हां अशा वेळीं न्यायाधीशांनी आपली अक्कल वापरली पाहिजे आणि तशी ते वापरतातही. या बाबतींत योग्य कायदा करणेंही कठिण आहे आणि प्रत्येक खटल्यांत व्यक्तिशः कोणावर कितपत जबाबदारी येते हें पाहूनच शिक्षा केली पाहिजे.

---

# सुखी देश

प्रसिद्ध इंग्रज लेखक सी. ई. एम्. जोड् हे नुकतेच उत्तर यूरोपांत प्रवास करून येऊन वर्णन करतात की आधुनिक यूरोपांत स्वीडन, डेन्मार्क आणि स्वित्झर्लंड हे यूरोपांतील सर्वांत सुखी देश आहेत. त्यांतल्या त्यांत डेन्मार्कमध्यें चार वर्षेपर्यंत जर्मन सैन्य जबरदस्तीनें जाऊन राहिल्यामुळे तेथे कांहीं नित्योपयोगी वस्तूंचा तुटवडा झाला आहे, परंतु तेथेही दुकानांत अन्न विपुल दिसतें आणि लवकरच तेथे युद्धपूर्व कालाइतकी समृद्धि होईल. स्वीडनला हा त्रास झाला नाही, तेव्हां तो हल्ली सर्वांत सुखी देश आहे. (न्यू स्टेट्समन ॲन्ड नेशन)

याचीं कारणें त्यांनी पुढीलप्रमाणें दिलीं आहेत. हे देश एका बाजूला पडल्यामुळे त्यांना युद्धाचा फारसा त्रास झाला नाही. त्यांना वसाहती किंवा काबीज प्रांत मुळीच नसल्यामुळे अवाढव्य सैन्य ठेवावें लागत नाही आणि

त्यांचा कोणाला हेवा न वाटल्यामुळे त्यांच्या वाटेला कोणी जात नाही. डेन्मार्क-मधें जरी जर्मन सैन्य होतें, तरीही त्याने तद्देशीयांना विशेष त्रास दिला नाही.

जोड यांचे मतें स्वीडन व डेन्मार्क येथील लोक फारसे संवेदनाशील नाहीत, यामुळे ते जात्याच आनंदी असतात. त्यांचे कामविषयक कायदे सोयीचे आहेत, याचेंही कारण तेंच आहे. सर्व यूरोपांत अनौरस मुलांचें आणि सोड-लग्नांचें प्रमाण स्वीडनमधें जास्त आहे. पतिपत्नींपैकी कोणाही अेकाच्या अिच्छेने तेथे अेका वर्षाचे आंत सोडचिठ्ठी मिळते आणि त्याकरतां कोणतेंही कारण द्यावें लागत नाही. सोडचिठ्ठीचे बाबतींत ही आदर्श व्यवस्था आहे. अशा प्रसंगीं अिंग्लंडांत दुःख, राग, द्वेष, वगैरे भरपूर दिसतात, पण स्वीडनमधें नुकताच सोडलेला नवरा आपल्या माजी बायकोला आणि तिच्या भावी पतीला मेजवानी देतो आणि त्यांना आशीर्वाद देतो. जोड यांचे मतें याचें कारण त्यांच्या भावनाच तीव्र नसतात, पण आम्हास तसें वाटत नाही. हा केवळ वेगळ्या चालीरीतींचा परिणाम आहे. कांही देशांत किंवा जातींत कोणी मेला की दुःखाचें प्रदर्शन करणें योग्य समजतात, कांही जातींत तसें करीत नाहीत, पण म्हणून त्यांना दुःख होतच नाही असें म्हणतां येणार नाही. हिंदुस्थानांतही अेकाकाळीं विवाहित स्त्रिया पाहिजे त्या पुरुषाबरोबर जाऊं शकत असत असें श्वेतकेतूच्या गोष्टीवरून सिद्ध होतें. पण नंतर स्त्रीने व्याभिचार केला तर तिचा खून करणेंही क्षम्य मानूं लागले. पण श्वेत-केतूच्या वेळेपासून हिंदूंच्या भावना अधिकाधिक तीव्र होत गेल्या असें मान-ण्याचें कारण दिसत नाहीं. नीतीच्या कल्पना बदलत असतात आणि समाजांत जी नीति चालू असेल तिला धरून चालण्याची, किंवा निदान तसें ढोंग कर-ण्याची, लोकांची प्रवृत्ति असते.

पण जोड यांनी सुखाचें मुख्य कारण सांगितलें आहे तें वेगळेंच आहे. तें असें की या देशांतील लोकसंख्या अत्यंत मर्यादित आहे, स्वीडनमधें फारतर ७० लक्ष आणि नार्वे व डेन्मार्कमधें प्रत्येकी ४० लक्ष. पण त्या मानाने या देशांचा विस्तार मोठा आहे. सारांश अन्नाच्या उत्पादनाच्या जास्त मानाने लोक-संख्या बेतांत आहे, यामुळे पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त असें कोणत्याही बाबतींत

दिसत नाही. ट्रॅम, आगगाडी, दुकानें, वगैरेमधें केव्हांही गर्दी नसते. अिग्लंडप्रमाणें आगगाडींत जागा मिळण्याकरतां तासचे तास अगोदर येऊन बसावें लागत नाही आणि नाटकाचीं तिकिटें महिनाभर अगोदर काढून ठेवावीं लागत नाहीत. रहायला जागा मिळत नाही असें कधीही होत नाही आणि बेकारीचा मागमूस नाही. रस्त्यांत मोटरींची गर्दी झाल्यामुळें लंडनमधें जसा जीविताला धोका उत्पन्न होतो, तसा तेथे कधीही होत नाही.

या गोष्टी क्षुल्लक आहेत असें कोणाला वाटेल, पण रोजच्या जीवनांत या क्षुल्लक गोष्टींना अतिशय महत्व असतें. अशा सोयींनी मनुष्याचें मन शांत राहतें, तो चिडखोर होत नाही, आणि सुखाच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे.

संततिनियमनाविरुद्ध अेक आक्षेप नेहमी येत असतो की त्याने लोकसंख्या मर्यादित होते अितकेंच नव्हे तर मुलांची संख्या कमी होऊन प्रौढांचें प्रमाण फाजील वाढतें. जोड यांचे मतें ही अिष्टापत्ति आहे. अिंग्लंडांत अेखाद्या कोंदट जागेंत अेका शिक्षकिणीला पन्नास मुलांचा वर्ग शिकवावा लागतो, पण स्वीडनमधें हवाशीर जागेंत अेक शिक्षकीण पंधराच मुलांचा वर्ग शिकवते, यामुळे तिला प्रत्येक मुलाकडे व्यक्तिशः लक्ष देतां येतें, तसें अिंग्लंडांत शक्य नसतें. मुलांचें प्रमाण कमी असलें तरच त्यांचें योग्य शिक्षण आणि संगोपन होणें शक्य आहे. लोकसंख्या फाजील असल्याचा युद्धांत देखील उपयोग नाही, कारण हल्लीचीं शस्त्रास्त्रें कोणत्याही देशाचा नायनाट करतील आणि त्यांचा शोध गर्दीच्या देशांनाच लागतो असें नाही.

---

# अिंग्लंडांतील अेक तक्रार

अिंग्लंडांत सुप्रजननाचा पुरस्कार करणाऱ्या 'युजेनिक्स सोसायटी' चें 'यूजेनिक्स रिव्ह्यू' नांवाचें जें मुखपत्र निघत असतें, त्यांत अेका पत्रलेखकानें एक तक्रार केली आहे, तिचा सारांश असा की 'उच्च शिक्षण घेतलेल्या

स्त्रियांनी अभ्यासाची संवय लावून घेतल्यामुळे पुष्कळ वेळां त्यांची संगमेच्छा नाहीशी होते याबद्दल आतां शंका राहिलेली नाही. आणि शिवाय अशा स्त्रियांना चांगल्या पगाराच्या जागा मिळाल्यामुळे त्यांना अविवाहित रहावेंसें वाटतें, किंवा त्यांनी लग्न केलेंच तर त्यांना मुलें व्हायला नको असतात, कारण मुलें झाल्याने कामांत व्यत्यय येतो. यांतलें आर्थिक कारण जरी खरें असलें, तरी मानसिक कारणच अधिक महत्वाचें आहे. माझ्या अेका मित्राचें मी उदाहरण देतों. त्याचें अेका मुलीवर प्रेम बसलें. ती सुस्वरूप आणि बुद्धिमान असून शिक्षकीण होती. त्यांचें लग्न झालें, पण वर सांगितलेल्या अडचणीमुळे त्यांचें पटलें नाही आणि शेवटीं सोडलग्न करावें लागलें. या मुलीला जर शिक्षणाची संधि मिळाली नसती, तर तिला घरकाम किंवा असेंच कांहीतरी कमी पगाराचें काम करावें लागलें असतें, आणि मग तिचें लवकर लग्न होअून तिची बुद्धि मुलांत उतरली असती. अगोदरच आपल्या मुलींची प्रवृत्ति कामवासनेला हीन मानण्याची असते, पण ती निसर्गतः उत्पन्न झाल्यावर तिला मनाची समजूत घालावीच लागते. पण तीही उत्पन्न न झाली तर ती लग्नाच्या आणि मुलें होण्याच्या विरुद्धच राहणार. याचा परिणाम असा होतो की ज्यांना मुलें होण्यांत समाजाचा फायदा आहे, त्यांनाच तीं नकोशीं होतात. याला अिलाज काय ?'

---

# पत्रव्यवहार

आपल्या सप्टेंबरच्या अंकांत ‘ ज्या औषधांच्या जाहिराती दिल्या जातात, त्या निव्वळ खोट्या असतात ’ असें अेकानें विचारलेल्या प्रश्नास आपण उत्तर दिलें आहे. ‘ कोणत्याही जाहिरातीवर विश्वास न ठेवणें शहाणपणाचें होअिल,’ यावर मी असें विचारतों की माझा अेक मित्र आपलें कामोत्तेजक औषध मागवणार आहे, त्यास मी हें वाचून दाखवलें, तेव्हां तो म्हणाला, ‘ मग यांच्या तरी जाहिराती खऱ्या कशा समजाव्या ? हाही शहाणपणा होणार नाहीं. हेंही औषध खोटेंच मानलें पाहिजे आणि तें न मागवणेंच शहाणपणाचें होईल,’

असें त्याचें मत बनलें. तरी या शंकेचें निरसन व्हावें. आ. **ज्ञानेच्छु**

उ. आपण आमच्या वाक्यांचा बराच विपर्यास केला आहे. तरीपण आपली शंका रास्त आहे. ज्या जाहिरातींना आम्ही निव्वळ खोट्या म्हटलें आहे, त्या अेका विशिष्ट प्रकारच्या असतात आणि तो प्रकार तेथे दिला आहे, सर्वच जाहिरातींना आम्ही खोट्या म्हटलेलें नाही. 'औषधांच्या जाहिराती अितक्या प्रमाणांत खोट्या असतात की औषधाच्या कोणत्याही जाहिरातीवर विश्वास न ठेवणें शहाणपणाचें होअील,' असेंही म्हटलें आहे. पण तेथे देखील सर्वच जाहिरातींना खोट्या म्हटलें नाही. अर्थात् आमच्या जाहिराती खऱ्या असतात असें आम्ही म्हणूं, परंतु कोणताही जाहिरातदार तसेंच म्हणेल, तेव्हां आपल्या शंकेचें निरसन आम्ही करूं शकत नाही. आमची जाहिरात खोटी आहे असें मत बनलें तर तें न मागवणेंच रास्त होअील. **संपादक**

---

# शारदेचें पत्र

धार्मिक लोकांच्या अितके घमेंडखोर दुसरे कोणीच नसतात. प्रत्येक धर्म नीतीचा मक्ता आपल्याकडे घेतो आणि अितर सर्व धर्म आपल्या मानाने कमी प्रतीचे असें जाहीर करतो. स्वतःबद्दल घमेंड मारणें हें समंजस लोक मूर्खपणाचें समजतात, पण आपल्या देशाबद्दल किंवा धर्माबद्दल घमेंड मारण्यांत कोणालाच कांही हास्यास्पद दिसत नाही. पण जे जगाकडे डोळे उघडे ठेवून पाहतात, त्यांना वेगवेगळ्या समाजांतले नीतीचे नियम पाहून हंसूं आल्याशिवाय रहात नाहीं, आणि नीति आणि धर्म यांचा घोटाळा सार्वत्रिक असल्यामुळें वेगवेगळ्या धर्मांचेंही त्यांना हंसूं येतें. अर्थात् त्यांना स्वतःला अेखादा धर्म मान्य असला तर त्यांची निरीक्षणशक्तिच नाहीशी होअील आणि ते स्वतःला धन्य मानून अितरांना मात्र हंसतील.

हिंदूंचे वेद अीश्वरप्रणीत आहेत असें कांही हिंदु अजूनही मानतात. यहुद्यांचा धर्म प्रत्यक्ष अीश्वराने त्यांना सांगितला असें ते म्हणतात. क्रिस्ती

धर्म देवाच्या मुलाने स्थापिला असें क्रिस्ती लोक समजतात, पण हा मुलगा देवाशीं अेकरूप मानतात. या दोन्ही धर्मांत सुधारणा करून मुसलमानांचा धर्म निघाला असें ते मानतात. आणि तोही अप्रत्यक्ष रीतीने औश्वराकडून आला! या तिन्ही धर्मांचा देव अेकच आहे. हिंदूंना पुष्कळ देव होते, पण नंतर तो अेकच आहे असें ते म्हणूं लागले. बौद्ध व जैन हे धर्म हिंदूंतून फुटलेल्या लोकांनी काढले, तरी या दोहोंना हिंदू आपल्यांतच ओढायला पाहतात. हिंदु आणि मुसलमान धर्मांत तडजोड म्हणून शिखांचा धर्म निघाला, पण धर्मांनी नेहमी तडजोडीपेक्षा फूटच जास्त होते. यहुदी, क्रिस्ती, मुसलमान, या तिन्ही धर्मांचें अेक अेक पुस्तक आहे आणि त्यांना यांतच घमेंड वाटते. हिंदू धर्म कोणत्याही पुस्तकाने बांधलेला नाही, पण हा कमीपणा राहूं नये म्हणून कांही लोक भगवद्गीतेला हिंदु धर्माचें पुस्तक मानतात. हें पुस्तक म्हणजे महाभारताचा अेक भाग आहे, पण मूळ महाभारतच अेकाने लिहिलेलें नसल्यामुळे त्यांत जी खिचडी झाली आहे, त्यांतलाच अेक मासला म्हणजे भगवद्गीता आहे. तींत सुसंगति बिलकुल नाही.

महाभारतांतल्या विसंगतीचा अेक मासला म्हणजे अनुशासनपर्वांत अेक लांबलचक' 'उमामहेश्वरसंवाद' आहे. त्यांत अेके ठिकाणीं शंकराने मांसभक्षणाचा निषेध केलेला आहे, पण त्यानेच त्याच संवादांत पितरांना अमुक प्रकारचें मांस दिल्याने त्यांची अमुक कालपर्यंत तृप्ति होते असें सांगितलें आहे. उदाहरणार्थ हरणाच्या मांसाने पितरांची सहा महिनेपर्यंत तृप्ति होते, पण गेंड्याचें मांस दिलें तर त्यांची बारा वर्षेपर्यंत तृप्ति होते असें सांगितलें आहे. आणि अर्थात् पितरांना हे मांस द्यायची पद्धत म्हणजे श्राद्धाच्या वेळीं ब्राह्मणांना तें वाढायचें, म्हणजे तें पितरांना पोंचतें. मग मांसाहाराच्या निषेधाची काय किंमत राहिली?

हिंदू धर्मांत अेक गोष्ट मात्र चांगली आहे की ज्याने त्याने आपआपला धर्म पाळावा, धर्मांतर करूं नये असें सांगितलें आहे. स्वतःचा धर्म सर्वांत चांगला ही घमेंड जरी हिंदूंनाही असली, तरी तिचा अतिरेक झालेला नाही. क्रिस्ती लोकांना मात्र अशी घमेंड असते की जो क्रिस्ती नसेल तो नक्की नरकांतच

जाणार, आणि म्हणून त्यांचे मिशनरी 'येन केन प्रकारेण' लोकांना क्रिस्ती करण्याचा त्यांच्या मताने स्तुत्य प्रयत्न करीत असतात. ते लोकांचें मन वळण्याचा प्रयत्न करतात, तेवढ्यानें न भागलें तर नोकरीचें किंवा अितर अमिष दाखवतात, किंवा त्याहीपलीकडे जाऊन, पाण्याच्या विहिरींत पावाचा तुकडा टाकून, तें पाणी प्याल्याने तुम्ही आतां बाटलात, आतां तुम्हाला क्रिस्ती धर्माची दीक्षा घेतल्याशिवाय गत्यंतर नाही, असें सांगून फसवतात, आणि पुष्कळ हिंदु असल्या थापांनी फसण्याअितके बावळट असतात. पण ते निदान मुसलमानांसारखे तरवारीची धमकी दाखवून लोकांना बाटवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. तेव्हां दगडापेक्षा वीट मऊ या न्यायाने मुसलमानांपेक्षा ते शतपट बरे म्हणावे लागतात. तरवारीच्या जोरावर लोकांना धर्म बदलायला लावणें हें निबुद्धपणाचें आणि रानटीपणाचें लक्षण आहे आणि दुर्दैवाने हा धर्म हिंदुस्थानांत अशा मार्गांनीच पसरला आहे. हिंदुंच्या दुबळेपणाचा हा परिणाम आहे. तो दुबळेपणा त्यांनी टाकला नाही तोपर्यंत त्यांना यापासून धोका आहे. गांधींच्या अहिंसेचा परिणाम भयंकर होण्याचा संभव आहे. सुदैवाने गांधींचे भक्त म्हणविणारे देखील सुऱ्याने मरायला तयार नाहीत. सध्यांचे कायदे आणि त्यांनाच चिकटून राहिलेलें कांग्रेस सरकार कोणाला स्वतःचें संरक्षण देखील करूं देत नाहीत. प्रथम शस्त्रबंदीचा कायदा रद्द केला पाहिजे आणि प्रत्येकाने स्वतःचें संरक्षण करायला शिकलें पाहिजे. दुसऱ्यावर निष्कारण हल्ला करूं नये असेंच माझें मत आहे, पण ठोशाला ठोसा मात्र देणें जरूर आहे, अेरवीं पळून जाण्याशिवाय मार्ग नाही, कारण गांधींनी कांही सांगितलें तरी स्वस्थ राहून भोंसकून घ्यायला कोणीच तयार नाही.

घमेंडीच्या बाबतींत पहिला नंबर कोणाचा लागेल हें सांगणें कठिण आहे. आपल्याशिवाय सगळे लोक नरकांत जाणार, अेवढ्यावरच क्रिस्ती लोक थांबत नाहीत. दया, विनय, न्यायबुद्धि, वगैरे जे गुण सर्व जगभर चांगले मानलेले आहेत, त्यांना ते क्रिस्ती गुण म्हणतात. हिटलरसारखे लोक या क्रिस्ती देशांतच झाले आणि हिटलरपेक्षां जास्त क्रौर्य चंगिझखानानें सुद्धां दाखवलें

नसेल. या गुणांची स्तुति सर्वच लोक करतात, तेव्हां ते अमुक अेका धर्मांत आहेत म्हणण्यांत काय अर्थ आहे? नीतीच्या कल्पना धर्मांवर अवलंबून नसतात. उदाहरणार्थ क्रिस्ती देशांत अेकपत्नीत्वाला नीति समजतात आणि तेथे तसा कायदाही आहे, पण ही नीति बायबलावरून आलेली नाही. बायबलांत फक्त दुसऱ्याच्या बायकोचा अभिलाष धरूं नये असें सांगितलें आहे, स्वतःला किती बायका असाव्या हे सांगितलेलें नाही, अितकेंच नव्हे तर बायबलांतल्या पुष्कळ प्रसिद्ध माणसांना अनेक बायका होत्या. आपल्याकडे देखील अेकपत्नीत्वाची स्तुति करतात, पण हिंदु धर्मांत तसें सांगितलें नाही. अर्थात् अेकपत्नीत्वाचा नियम मूर्खपणाचा आहे हा प्रश्न वेगळा. पण अमुक धर्मांत अमुक नीति सांगितली आहे, अेवढ्यावरून तो श्रेष्ठ ठरत नाही. ज्या समाजांत नीतीचे नियम अधिक कसोशीनें पाळले जात असतील, तो समाज नीतीच्या दृष्टीनें श्रेष्ठ ठरेल. पण अर्थात् माझी नीतीची व्याख्या अेवढीच आहे की दुसऱ्याला शक्य तों त्रास देऊं नये आणि शक्य तर सहकार्य करावें. पण धार्मिक लोकांकडे पहावें तर ते दुसऱ्याला त्रास देण्याच्या बाबतींत सर्वांच्या पुढे असतात. धर्म म्हटला की भांडण, लढाअी, छळ, वगैरे ठेवलेलींच. धर्म आहेत तोपर्यंत सहकार्य अशक्य आहे.

'महा-राष्ट्र' मासिकाच्या आक्टोबरच्या अंकांत 'उणीव' नांवाची कविता छापली आहे. कविता वाअीट नाही, पण आधुनिक कवि आळशी झाले आहेत आणि श्रम टाळण्याकरतां ते कवींच्या निरंकुशत्वाचा फाजील फायदा घेतात हें त्यांत स्पष्ट दिसतें. अेका ठिकाणीं अेका मात्रेची चूक आहे, ती कदाचित् जुळाऱ्यावर लादतां येअील, पण अेक ओळ 'मग नुरेचि कर्तव्यता' अशी आहे. मागच्या ओळीच्या शेवटीं 'ता' हें अक्षर आहे, तेव्हां यमकाच्या दृष्टीनें हें ठीक आहे, अितकेंच कवीने पाहिलें. यमकाला जुळत असतें तर त्याने याअैवजी 'कर्तव्यतात्व' असें देखील बहुधा लिहिलें असतें. अितका हलगर्जीपणा करण्यापेक्षा यमकें न जुळवलीं तर काय होअील? निर्यमक कविता अशा आळशी कवींनीच पुरस्कारली आहे आणि त्याच्या पुढची पायरी म्हणजे मुक्तछंद.

तुझी शारदा